लाल रक्त क्रांती दिन
२४.०९.२००९

माझ्या प्रिय बंधू भगिनींनो २४ सप्टेंबर २००९ हा धारावी कोटावरील लोकांचा इतिहास जमा क्रांती दिन म्हणून नोंदला गेला. गेले बारा दिवस-रात्र साखळी पद्धतीने उपोषण शांततेने डोंगरी, आनंदनगर व पालखवाडी, भूतबंगला या ठिकाणी बसून डोंगरी चौक, पाली, उत्तन व या गावातील उपविभागातील लोकांनी पार पाडून कचऱ्यांच्या डंपरांना डंपींग ग्राऊन्ड वर पाठवून दिले नाही. २४ सप्टेंबर २००९ रोजी सकाळी ७.३० वाजता पोलीस बंदोबस्तात कचऱ्याच्या गाड्या आनंद नगर डोंगरी विभागात आल्याबरोबर स्थानिक बाया (स्त्रीयांनी) अटकाव केला की आम्ही कचऱ्याच्या गाड्या पुढे जावू देणार नाहीत ही परिस्थीती पाहून कॅच न लावलेल्या पोलीसांनी स्त्रियांवर लाठी हल्ला सुरु केला. मुदत संपलेल्या अश्रू धुराच्या बॉम्ब नळकांड्या लोकांवर फेकल्या, पुरुष पोलिसांना स्त्रियांवर हात उचलायचा अधिकार नसताना देखील घराघरात जावून बाया माणसांवर हल्ला केला. बायांचे पाय खेचून साड्या ओढून छातीवर, पाठीवर व डोक्यावर जबर लाठी चार्ज केला, पाली पॅरीशचे फा० बोना, उत्तन पॅरिशचे फा० लेस्ली माळ्या, डोंगरी कॉन्वेन्टच्या व स्टेला मॉरिसच्या सिस्टरांवर डोक्यावर पायावर अमानुष फायबर लाठ्यांनी हल्ला केला. डोंगरी तारोडी आनंद नगर, पालखवाडी च्या तरुण मुली मुलांवर म्हाताऱ्या व आजारी बायांवर सुद्धा पुरुष पोलीसांनी मागे पुढे पाहिले नाही. लोकांनी चर्चची घंटा मारुन, स्थानिक सर्व जमातीतील लोकांचा जमाव करुन सकाळी ७.०० ते संध्याकाळी ७.०० वाजेपर्यंत उपवास करुन कचऱ्याच्या गाड्या रोखून धरल्या. झालेल्या अमानुष कृत्याचा सर्व धर्मिय लोक धिक्कार करतात. धन्यवाद. ...२

तिन वर्षे झाली स्थानिक लोक डंपिंग ग्राऊन्ड च्या त्रासाने बेजार झाले आहेत. डंपिंग ग्राऊंड लोक वस्ती, शाळा - उत्तन संत जोसेफ मराठी शाळा, रिजवान इंग्लीश स्कूल, आमचं घर शाळा, उत्तन चर्च, पाली चर्च, डोंगरी चर्च, स्टेला हॉस्पीटल ह्या सर्वांच्या एक ते अर्धा किलो मिटर परिसरात आहेत. शालेतील मुलांना कातडीचे रोग सुरु झाले आहेत. नव गर्भवती [redacted] स्त्रिया, लहान अजाण बालके म्हातारी व आजारी माणसे आजारी पडली आहे. संपूर्ण दिवस त्रासाने सर्व परिसर बेजार झाला आहे. तरी हे डंपिंग स्वर्गीय सैतान आमच्या मूळ स्थानिक लोक (SON OF SOIL) वर थापलेला राक्षस आहे. एकीकडे मुंबई सारख्या ठिकाणी श्वासाला गुदमरलेली लोक धारावी बेटावर शुध्द हवे साठी फिरायला येतात त्याच ग्रीन झोन परिसरात डंपिंग ग्राऊंड व तेही १ ते २ किलोमिटर वर असलेल्या लोक वस्तीत वसवलेले आहे. गांधीजींच्या अहिंसेच्या मार्गाने चालेल्या लढयाला पोलीसांनी हिंसेचं रुप दिलं जे लोकांचे रक्षण करणारे आहेत त्यांनीच कायदा हाती घेतला यापेक्षा दुर्दैवाची कोणती गोष्ट असू शकेल. आमचं घर शाळेच्या शिक्षक फ्लेचर बुरखेन शाळेतील मुलांना घेऊन मोर्च्यात सहभागी झाले होते त्या शाळेतील मुलांवर व शिक्षकावर जबरदस्त लाठी हल्ला पोलीसांनी केलेला आहे. वरील वर्णन संपूर्ण सत्य असून हजारो लोकांनी आपल्या उघडया डोळ्यांनी बघीतलं किती शरमेची व खेदाची ही बाब आहे.

भूमिपुत्र धारावी बेट